साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपश्यना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2568, आषाढ पौर्णिमा, 21 जुलै, 2024 वर्ष 8 अंक 4

**वार्षिक शुल्क** रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**यं किञ्चि रतनं लोके, विज्जति विविधा पुथु।**
**रतनं धम्म समं नत्थि, तस्मा सोत्थि भवन्तु ते॥**

*– अभय परित्त - ७,*

– लोकात विविध प्रकारची जी रत्न आहेत, त्यामध्ये कोणतेही धर्म-रत्नासारखे नाही. या सत्याने तुमची स्वस्ति होओ!

# धर्म रत्न उपहार!

**पुक्कुसाति (1)**

## धर्म रत्न उपहार!

विपश्यना साधनेवर भगवान बुद्धांनी दिलेल्या एका परम कल्याणकारी उपदेशाच्या संदर्भात आणखी एक चित्र समोर उभे राहिले आहे ज्यात मगधनरेश बिंबीसारची धर्म-मैत्री उजेडात येते.

त्या काळात प्रवासाची आणि संवाद-संचाराची साधने आजच्यासारखी जलदगती आणि सुविधापूर्ण नव्हती त्यामुळे दूरवरच्या देशांमधील पारस्परिक राजनैतिक संबंध स्थापित करणे सोपे नव्हते. बिंबीसार स्वभावतः च दूरच्या देशातील राजांशी मैत्री-संबंध स्थापित करु इच्छित होता, तेव्हा तो अशा संधी शोधायचा की ज्यामुळे त्याचा हेतू पूर्ण होईल.

एकदा गंधार देशाची राजनगरी तक्षशिलाहून काही व्यापारी तिथे उत्पन्न होणारा माल मगध देशात विकण्यासाठी तसेच इथे उत्पन्न होणारा माल खरेदी करून आपल्या देशात घेऊन जाण्यासाठी राजगृहला आले. त्या दिवसांत व्यापाऱ्यांचा अशा "सार्थ" म्हणजे "काफिला" च्या मार्फतच दोन देशांमधील पारस्परिक उद्योग-व्यापार चालत असे. हे व्यापारी राजगृहला पोहोचल्यावर त्या दिवसातील प्रचलित प्रथेचे पालन करत सर्वप्रथम महाराज बिंबीसारला नजराणा भेट देण्यासाठी, त्याचे दर्शना करण्यासाठी राजदरबारात पोहोचले.

कुशल-क्षेम विचारल्यानंतर बिंबीसारने प्रश्न केला - "कोणत्या देशातून आला आहात?"

"तक्षशिलेहून महाराज!"

"कोण शासक आहे तुमच्या देशाचा?"

"राजनरेश पुक्कुसाति, महाराज!"

"काय तो धर्मिष्ठ राजा आहे?"

"अत्यंत धर्मिष्ठ आहे महाराज! प्रजेचे पालन आपल्या मुलांप्रमाणे करतो. प्रजेच्या सुख-दुःखाला आपले सुख-दुःख समजतो."

"काय वय आहे त्याचे?"

"आपल्याइतकेच महाराज!"

"वयही माझ्याइतके आणि प्रजावत्सलतेचा राजधर्म निभावण्यातही माझ्यासारखा. मग तर अशा व्यक्तीशी मी अवश्य मैत्री-संबंध स्थापित करु इच्छितो. व्यापाऱ्यांनो काय तुम्ही माझी इच्छा पूर्ण करण्यात सहायक बनू शकाल?"

"अवश्य महाराज!"

"तर मग जा, व्यापार-धंद्याचे काम पूर्ण करून स्वदेशी परतण्याआधी मला पुन्हा एकदा भेटा. तुमच्या माध्यमातून मी तुमच्या राजाप्रति मैत्री-संदेश पाठवेन."

"असा संदेश घेऊन जाण्यात आम्हाला आनंदच वाटेल महाराज!"

काही दिवसांनंतर व्यापाऱ्यांनी आपल्यासोबत आणलेला गंधार देशातील माल विकला आणि मगधचा माल खरेदी करून स्वदेशी परतू लागले तेव्हा ठरवलेल्या वायद्यानुसार महाराज बिंबीसारला भेटण्यास आले.

महाराज बिंबीसारने म्हटले, "नरेश पुक्कुसातिला भेटल्यावर माझ्याकडून वारंवार त्याचे कुशल-क्षेम विचारा आणि सांगा की मी त्याला आपला मित्र बनविण्यासाठी उत्सुक आहे. त्याच्याप्रति माझा मित्रभाव प्रकट करा."

व्यापाऱ्यांनी स्वीकृती दिली आणि ते प्रसन्नचित्ताने स्वदेशी परतले. तक्षशिलेमध्ये गंधार नरेश पुक्कुसातिला भेटून त्याला मगध सम्राटाचा मैत्री-संदेश दिला. पुक्कुसाति खूप आल्हादित झाला. त्याने व्यापाऱ्यांप्रति आपले आभार प्रकट केले. मगधसारख्या विशाल, शक्तीशाली साम्राज्याच्या सम्राटाशी मित्रता होणे गंधार नरेशासाठी खरोखरच गौरवाची गोष्ट होती. या मैत्रीला आणखी दृढ करण्यासाठी त्याने समजदारीची अनेक राजनैतिक पावले उचलली.

काही दिवसातच मगध देशाहून व्यापाऱ्यांचा एक सार्थ (काफिला) व्यापारासाठी तक्षशिलेला पोहोचला. हे व्यापारी जेव्हा भेट-नजराणा घेऊन गंधार नरेशला भेटायला आले तेव्हा त्याने प्रसन्नता प्रकट केली. मगध नरेशच्या कुशल स्वास्थ्याविषयी चौकशी केली आणि ही घोषणा केली की हे व्यापारी माझ्या मित्राच्या देशातून आले आहेत त्यामुळे ते माझे अतिथी आहेत, गंधार राज्याचे अतिथि आहेत. त्याने तक्षशिला नगरात

दवंडी पिटवली की माझा मित्र मगध सम्राटाच्या देशाहून जो व्यक्ती गंधार देशात व्यापार करण्यासाठी येईल, एकटा किंवा सार्थ समूहासोबत, पायी किंवा वाहनावर, कसाही जरी आला तरी त्याला राजकीय पाहुणा म्हणून मानले जाईल. त्याचबरोबर याकडेही लक्ष दिले जाईल की माझ्या मित्राच्या देशाचे ते नागरिक असल्यामुळे अशा लोकांच्या सुरक्षेचा विशेष प्रबंध करण्यात येईल. त्यांना राजकीय कोष्ठागार (अतिथिशाळे)मध्ये थांबविण्यात येईल. त्यांना माझ्या देशात कोणतेही कष्ट होऊ नयेत. त्यांनी आणलेल्या विक्रीच्या मालावर कोणताही आयातकर घेतला जाऊ नये.

सम्राट बिंबीसारला जेव्हा ही सूचना मिळाली तेव्हा त्यानेही महाराज पुक्कुसातिला आपला अदृश्य मित्र घोषित केले आणि आपल्या राजधानीमध्ये ही दवंडी पिटवली की गंधार देशाच्या व्यापाऱ्यांना त्या सर्व सुविधा दिल्या जाव्यात की ज्या मगधच्या व्यापाऱ्यांना गंधार देशात दिल्या जातात.

हल्लीदेखील दोन राष्ट्रांमध्ये मैत्री-संधी झाल्यावर आवागमन करणे, आयात-निर्यात करणे यासाठी करमाफी अथवा इतर राष्ट्रांच्या तुलनेत कमी कर आकारण्याचे प्रयोजन असते. मित्र राष्ट्राला "मोस्ट फेवर्ड नेशन" घोषित केले जाते आणि "ड्यूटी-फ्री" किंवा "ड्यूटी-प्रेफरन्स" ची सुविधा दिली जाते. वर्तमान युगाच्या याच राजनैतिक नीतीचे हे पूर्व संस्करण आपल्याला या चित्रात पाहायला मिळते. परंतु विशेषता ही आहे की त्या दिवसांत मित्र राष्ट्राच्या नागरिकांना राज्य-अतिथीचा सन्मानही दिला जात असे. परंतु हे तेव्हाच शक्य होते जेव्हाकी लोकांचे येणे-जाणे खूप मर्यादित संख्येत असायचे. जे असेल ते, वरील घटना हे सिद्ध करते की त्या काळातील भारतातही दोन देशांमधील मित्रता निभावण्याकरीता अशा प्रकारच्या सुविधा दिल्या जात होत्या. हो, हा फरक अवश्य होता की एकतंत्र शासकांचे राज्य असल्यामुळे दोन शासकांची व्यक्तिगत मैत्रीच दोन राष्ट्रांच्या मैत्रीत बदलत होती. जसे की मैत्री तर बिंबीसार आणि पुक्कुसातिमध्ये झाली आणि त्याचा लाभ दोन्ही देशांच्या नागरिकांना आणि त्यांच्या पारस्परिक व्यवसाय-व्यापाराला मिळाला.

दोन्ही शासकांचा मैत्रीभाव दिवसें-दिवस दृढहून दृढतर होत गेला. एक दुसऱ्याला पाहू शकले नाहीत परंतु काळाच्या ओघात पारस्परिक पत्राचाराने तसेच बहुमूल्य उपहारांच्या आदान-प्रदानाने त्यांचा मैत्रीभाव अत्यंत पुष्ट होत गेला.

जसे आजच्या काश्मीरमध्ये तसेच त्या काळातील काश्मीरमध्येही जे गंधार देशाचे एक अंग होते, बहुमूल्य ऊबदार शाली-दुशाली बनत असत, की ज्या मगधसारख्या मध्यदेशात दुर्लभ होत्या. एकदा पुक्कुसातिने आपल्या मित्राला आठ खूप किंमती आणि सुंदर पंचरंगी उबदार शाली पाठविल्या, ज्याची बनावट अद्वितीय होती. ही भेटवस्तूची पेटी मोठ्या थाटा-माटात राजगृहला पाठविण्यात आली जिथे एका भव्य समारोहात, राज-अमात्यांच्या आणि प्रमुख नागरिकांच्या उपस्थितीत ती उघडली गेली. लोक या भेटींना पाहून हर्ष आणि विस्मय-विभोर झाले. अशा अत्यंत किंमती शाली मगधवासियांनी आधी कधी पाहिल्याच नव्हत्या, वापरणे तर दूरच राहिले. किती सुंदर नयनाभिराम रंग! किती सुकोमल स्पर्श आणि किती विशाल! प्रत्येक शाल 8 हात रुंद आणि 16 हात लांब!

लोकांनी आपली प्रसन्नता प्रकट करताना कानशिलावर बोटे मोडली आणि आपले दुपट्टे हवेत उडवले (अशा प्रकारे की आजकाल टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला जातो.) बिंबीसार देखील या उपहारांनी अत्यंत प्रसन्न झाला. त्याने यातील चार शाली भगवानांच्या विहारात दान स्वरूपात पाठवून दिल्या आणि बाकी चार राजमहालात. लोकही या दुर्लभ उपहारांची प्रशंसा करत करत आपापल्या घरी परतले. गंधार नरेश पुक्कुसातिने आपला मित्र मगधराजला किंमती शाली पाठविल्या; याची पुष्कळ लोक-चर्चा झाली. राजमहालात परतल्यावर बिंबीसार विचार करू लागला की मित्राच्या या रत्नासारख्या बहुमूल्य भेटीच्या बदल्यात मला याहून अधिक मौल्यवान भेट पाठवली पाहिजे. काय राजगृहात याहून उत्तम रत्न नाही जे उपहारस्वरूपात पाठवता येईल? आहे, अवश्य आहे.

बिंबीसार जेव्हापासून भगवानांच्या संपर्कात आला आणि आपल्या आतमध्ये नित्य, शाश्वत, ध्रुव, अमृतपद निर्वाणाचा स्वत: साक्षात्कार करून स्रोतापन्न झाला तेव्हापासून बहुमूल्याहून बहुमूल्य, उच्चहून उच्च लोकीय वस्तू त्याच्यासाठी स्पृहणीय राहिल्या नाहीत. तरीही तो आपले सांसारिक उत्तरदायित्व भल्या प्रकारे निभावत राहिला, पण आता आसक्ती तुटू लागल्या. आता तो रत्नाचा खरा पारखी बनला. त्यामुळे या दिशेने त्याचे चिंतन सुरु झाले.

संसारात रत्ने तर अनेक प्रकारची असतात. हीरा-पन्ना सारख्या निर्जीव रत्नांच्या तुलनेत सजीव रत्ने उत्तम. हत्ती-घोड्यासारख्या सजीव रत्नांच्या तुलनेत पुरुष आणि स्त्री रत्ने उत्तम. सामान्य स्त्री-पुरुषांसारख्या रत्नांच्या तुलनेत आर्य श्रावक रत्न उत्तम. आर्य श्रावक रत्नांच्या तुलनेत बुद्ध-रत्नच सर्वोत्तम. मी खरोखर भाग्यशाली आहे की माझ्या राज्यात बुद्धांसारखे सर्वश्रेष्ठ रत्न विद्यमान आहे.

बिंबीसारने गंधारहून आलेल्या सार्थवाहकांना विचारले,

"काय तुमच्या इथे बुद्ध, धर्म आणि संघ यासारखी रत्ने विद्यमान आहेत?"

त्यांनी उत्तर दिले, "नाही महाराज!"

बिंबीसारने विचार केला, तर मग मला हेच रत्न पाठविले पाहिजे की ज्यामुळे माझ्या मित्राचेही कल्याण होईल आणि त्या जनपदाच्या निवासींचेही. आत्ता-आत्ताच भगवान दुर्भिक्ष आणि व्याधींनी पीडित असलेल्या वैशाली नगरात जाऊन आले आहेत. ते तिथे पोहोचताच दुर्भिक्ष सुभिक्षमध्ये बदलून गेले. वैशालीची सर्व पीडा-व्याधी दूर झाली. लोक भगवानांच्या शिकवणीकडे वळाले. त्यांचे कल्याण झाले. याच रीतीने हे बुद्ध-रत्न गंधार देशात गेले तर खरोखर त्यांचे खूप कल्याण होईल. तो प्रत्यंत (प्रांत) प्रदेश या मध्यम देशापासून इतका दूर आहे की तिथे विहार करण्यासाठी भगवानांना प्रार्थना करणे उचित वाटत नाही.

भगवानांचे प्रमुख शिष्य सारिपुत्त आणि महामोग्गल्लान यांनाही तिथे जाण्यासाठी प्रार्थना करू शकत नाही कारण ते इथे राहिल्याने मला अपूर्व आश्वासन मिळते. जेव्हा कधी कोणत्या प्रत्यंत (प्रांत) प्रदेशात धर्मचारिकेसाठी निघून जातात तेव्हा थोड्याच काळात संदेशवाहक पाठवून त्यांना राजगृहला येण्यासाठी साग्रह आमंत्रित करावे लागते. त्यांच्या अनुपस्थितीत मला खूप अभाव असल्याचे जाणवते. त्यामुळे त्यांनाही इतक्या दूर पाठविले नाही पाहिजे. तर मग काय करावे?

तत्काळ मनात ही गोष्ट उपजली की माझ्या मित्राच्या इथे धर्म पोहोचला तर बुद्धच पोहोचले, संघच पोहोचला. शेवटी धर्मच ते रत्न आहे जे बुद्ध आणि संघामध्ये आहे. तेव्हा माझ्या मित्राकडे उपहारास्वरूप धर्मच पाठविला पाहिजे. बिंबीसारने हा निर्णय घेतला आणि त्वरीत धर्माचा उपहार पाठविण्याच्या तयारीला लागला. त्याने सुवर्णकारांकडून एक खूप लांब सुवर्ण-पत्र बनविले, ते असे की ना इतके पातळ की घडी घातल्यावर तुटेल आणि ना इतके जाड की घडीच घालता येऊ नये.

जेव्हा उपयुक्त सुवर्ण-पत्र तयार होऊन आले तेव्हा महाराज बिंबीसार सकाळी-सकाळी स्वच्छ आंघोळ करून, सफेद, साधे कपडे घालून तयार झाला. माला, गंध, विलेपन, मंडण तसेच अलंकार-आभूषण इत्यादी धारण करण्यापासून विरत (दूर) राहून त्याने अष्टशील व्रत घेतले आणि प्रात:काळी नाश्ता करून राजमहालाच्या मोकळ्या व्हरांड्यात येऊन बसला. त्याने एक सुवर्ण-शलाका हातात घेतली आणि हिंगुल-सिंदूरापासून बनलेल्या विशिष्ट रंगाने मोठ्या श्रद्धेने त्या सुवर्ण-पत्रावर लिहिणे सुरु केले.

इथे लोकात तथागत उत्पन्न झाले आहेत. ते भगवान आहेत, अर्हंत आहेत, सम्यक संबुद्ध आहेत, विद्याचरण संपन्न आहेत, सुगत आहेत, लोकज्ञ आहेत. लोकांना योग्य मार्गावर घेऊन जाणारे अनुपम सारथी

आहेत. देवतांचे आणि मनुष्यांचे शास्ता आहेत. असे आहेत भगवान बुद्ध!

त्यानंतर त्याने भगवानांचा जन्म, महाभिनिष्क्रमण, दुश्करचर्या, बोधिवृक्षाखाली सम्यक संबोधि सहित सर्वज्ञतेची प्राप्ती आणि तत्पश्चात लोक-कल्याणासाठी केल्या जाणाऱ्या धर्मचारिकेविषयी संक्षेपात लिहिले आणि सांगितले की इथे-तिथे तसेच परलोकातही कुठे तथागतांसारखे दुसरे कोणते रत्न नाही.

यानंतर अत्यंत श्रद्धापूर्वक धर्माविषयी लिहिले की जो भगवान शिकवतात तो सुआख्यात आहे, त्यात रहस्यमयी गुंतागुंत नाही. सांद्दष्टिक आहे, कल्पनांशी अजिबात संबंधित नाही. अकालिक आहे, तत्काळ फलदायी आहे. स्वत: येऊन पाहण्यालायक आहे, सरळ मुक्तीकडे घेऊन जाणारा आहे आणि प्रत्येक समजदार व्यक्तीकरीता स्वत:च्या अनुभूतीवर उतरविण्यायोग्य आहे.

आणि पुन्हा भगवानांच्या उपदेशांची संक्षिप्त व्याख्या करत 37 बोधिपक्षीय धर्मांचे विवरण दिले आणि लिहिले की भगवान जेव्हा धर्म शिकवतात आणि त्याच्या अभ्यासाद्वारे जी समाधी लागते ती केवळ लोकीय समाधीच नाही तर तिच्याबरोबर इंद्रियातीत फल-समापत्तीही प्राप्त होते. निर्वाणाच्या अवस्थेचाही साक्षात्कार होतो.

**"समाधिमानन्तरिकञ्ञमाहु।"**

या समाधीची कोणतीच तुलना नाही. धर्मात हे देखील अनमोल रत्न आहे.

आणि पुन्हा संघ-रत्नाविषयी समजावत लिहिले की भगवानांचा श्रावक संघ सुमार्गी आहे, ऋजुमार्गी आहे, ज्ञानमार्गी आहे आणि समीचीनमार्गी आहे. भगवान त्यांनाच श्रावक संघ मानतात की ज्यांनी स्रोतापन्न अथवा सकदागामी अथवा अनागामी अथवा अरहंत पदाला प्राप्त केले आहे. वास्तविकपणे अशा व्यक्ती परम पूजनीय आहेत. यातून कितीतरी असे आहेत ज्यांनी राजसिंहासन त्यागले आहे किंवा उपराज-पद त्यागले आहे अथवा मंत्री किंवा सेनापती पद त्यागले आहे आणि प्रव्रजित झाले आहेत. अशा प्रकारे प्रव्रजित होऊन महाशीलांचे पालन करत इंद्रियांवर स्मृती-संप्रज्ञानाचा पहारा बसवून संवर करणे शिकले आहेत आणि त्यांनी आस्रवमुक्त अरहंत अवस्था प्राप्त केली आहे.

त्यानंतर त्याने 16 प्रकारच्या आनापान स्मृती-साधनेची व्याख्या लिहिली. जेव्हा पत्र समाप्त करु लागला तेव्हा अचानक एक गोष्ट त्याच्या लक्षात आली की माझ्या मित्राजवळ पूर्व-जन्मांची चांगली पुण्य-पारमी असेल तर पत्र वाचून त्याच्या मनात धर्मसंवेग जागेल. धर्माच्या सैद्धांतिक पक्षाने तो खूप प्रभावित होईल. परंतु धर्माचा परम मुक्तीदायी मार्ग म्हणजे विपश्यना त्याला कशी प्राप्त होईल? मध्यदेशाचे लोक खूप भाग्यशाली आहेत जे भगवानांकडून ही विद्या प्रत्यक्ष शिकतात आणि माझ्यासारख्या सांसारिक जबाबदाऱ्यांनाही निभावतात. परंतु माझा मित्र पुक्कुसातिला हे शक्य होणार नाही. त्याचे कल्याण याच गोष्टीत आहे की त्याने शासनाच्या जबाबदाऱ्या कोणा इतर योग्य व्यक्तीकडे सोपवाव्यात आणि स्वत: घर-दार सोडून प्रव्रज्या ग्रहण करावी आणि भगवानांकडून विपश्यना शिकून परम मुक्त अवस्थेचा साक्षात्कार करावा. मनात हा भाव जागताच त्याने पत्राच्या शेवटी लिहिले, "जर तुमच्या मनात धर्म-संवेग जागला तर इथे येऊन भगवानांकडून प्रव्रज्या ग्रहण करा आणि आपली मुक्ती साधा."

कल्याणमित्र,
सत्यनारायण गोयंका

क्रमश:....

*(– वर्ष 20, बुद्धवर्ष 2534, वैशाख पौर्णिमा, दि. 28-04-1991, अंक 11 मधून साभार)*

------0------

## विपश्यना पगोडा परिचालनार्थ "सेंचुरीज कॉर्पस फंड"

**'ग्लोबल विपश्यना पगोडा'चा** दैनंदिन खर्च सांभाळण्यासाठी पूज्य गुरुजींच्या निर्देशानुसार एका **'सेंचुरीज कॉर्पस फंडा'ची** व्यवस्था केली गेली आहे. त्यांची ही महत्वाची इच्छा पूर्ण करण्यासाठी **'ग्लोबल विपश्यना फाउंडेशन'** (GVF) ने हिशोब केला की जर 1,39,000 जणांनी, प्रत्येकाने रु. 9000/- जमा केले, तर १२५ कोटी रुपये जमतील आणि त्याच्या मासिक व्याजातून हा खर्च होऊ लागेल. जर कोणी एकदम एकत्र जमा करू शकत नसेल तर थोडी-थोडी सुद्धा जमा करू शकेल. *(काहींनी पैसे जमा केले आहेत आणि विश्वास आहे की लवकरच हे कार्य पूर्ण होईल.)*

साधक तसेच असाधक सर्व दात्यांना हजारो वर्षांपर्यंत आपली धर्मदानाची पारमी वाढविण्याची ही एक सुसंधी आहे. अधिक माहितीसाठी तसेच निधी पाठविण्यासाठी—

**संपर्क:**– 1. Mr. Derik Pegado, 9920447110. or
2. Sri Bipin Mehta, Mo. 9920052156,
A/c. Office: 022-50427512 / 50427510;
Email– audits@globalpagoda.org;
**Bank Details:** 'Global Vipassana Foundation' (GVF),
Axis Bank Ltd., Sonimur Apartments,
Timber Estate, Malad (W), Mumbai - 400064,
Branch- Malad (W).
Bank A/c No.- 911010032397802;
IFSC No.- UTIB0000062;
Swift code: AXIS-INBB062.
Online Donation- https://www.globalpagoda.org/donate-online

## विपश्यना विशोधन विन्यास

विपश्यना विशोधन विन्यास (Vipassana Research Institute=VRI) एक अशी संस्था आहे जी साधकांकरीता धर्मासंबंधी प्रेरणादायक पाठ्य सामग्री मूळ किंमतीवर उपलब्ध करवून देते. इथले सर्व साहित्य अतिशय कमी किंमतीवर उपलब्ध आहे जेणेकरून जास्तीत जास्त साधक याचा व्यावहारिक लाभ घेऊ शकतील. विपश्यना साधनेसंबंधी अनमोल साहित्याचा हिंदी, इंग्रजी तसेच इतर भाषांमध्ये अनुवाद तसेच शोधकार्य करायचे आहे त्याकरीता विद्वानांची आवश्यकता आहे. शोधकार्य मुंबईच्या या पत्त्यावर होत असते- **'विपश्यना विशोधन विन्यास',** परियत्ति भवन, विश्व विपश्यना पगोडा परिसर, एस्सेल वर्ल्डच्या जवळ, गोराई गाव, बोरीवली पश्चिम, मुंबई- 400 091, महाराष्ट्र, भारत. फोनः कार्यालय: +9122 50427560, मो. (Whats App) +91 9619234126.

याव्यतिरिक्त VRI हिंदी, इंग्रजी आणि मराठीच्या मासिक पत्रिकांच्या माध्यमातून पूज्य गुरुजींच्या द्वारे झालेले पत्राचार, जुने ज्ञानवर्धक लेख, दोहे, इंटरव्यूह, प्रश्नोत्तर इत्यादींच्या स्वरूपाने प्रेरणाजनक संस्मरणांना प्रकाशित करत असते ज्यामुळे साधकांची धर्मपथावर उत्तरोत्तर प्रगती होत राहिल.

या सर्व कार्यांना पुढे अविरतपणे चालू ठेवण्यासाठी साधकांचा सहयोग अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात अनेक साधकांच्या लाभार्थ धर्मवाणीचे प्रकाशन अविरतपणे चालू राहावे याकरीता यामध्ये सहयोग देणाऱ्या इच्छुक साधकांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क करावा. या संस्थेमध्ये दानशूरांसाठी सरकारकडून आयकर अधिनियम 1961 च्या धारा 35-(1) (iii) या नियमानुसार 100% आयकराची सूट उपलब्ध आहे. साधक याचा लाभ घेऊ शकतात. **दानासाठी बँक विवरण अशा प्रकारे आहे:—**

**विपश्यना विशोधन विन्यास,** एक्सिस बँक लि., मालाड (प.)
खाते क्र. 911010004132846; IFSC Code: UTIB0000062

**संपर्क-** 1. श्री डेरिक पेगाडो - 022-50427512/ 28451204
2. श्री बिपिन मेहता - 022-50427510/ 9920052156
3. ईमेल - audits@globalpagoda.org
4. वेबसाइट- https://www.vridhamma.org/donate-online

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये

### 1. एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः

**रविवार 21 जुलै,** आषाढ-पौर्णिमा आणि (धम्मचक्कपवत्तन दिवस) निमित्ताने
**रविवार 29** सप्टेंबर, भाद्रपद-पौर्णिमा व पूज्य गुरुजींच्या पुण्य-तिथि निमित्ताने
**रविवार 19** जानेवारी 2025 सयाजी ऊ बा खिन व माताजींच्या पुण्य-तिथि निमित्ताने **एक दिवसीय** महाशिबिर होतील.

**Email:** *oneday@globalpagoda.org* **Online registration:** *http://oneday.globalpagoda.org/register*

### 2. एक दिवसीय शिबिर दररोज

या व्यतिरिक्त विपश्यना साधकांसाठी पगोडा मध्ये दररोज एक दिवसीय शिबिर आयोजित केली जात आहे. कृपया सामील होण्यासाठी खालील लिंक चा उपयोग करावा. आणि एक मोठ्या सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. *समग्गानं तपोसुखो।* **संपर्कः 022 50427500 (Board Lines)** - Extn. no. 9, मो. **+91 8291894644.** (प्रतिदिन 11 से 5 बजे तक)

Online registration: http://oneday.globalpagoda.org/register; **Email:- guruji.centenary@globalpagoda.org or** Email: oneday@globalpagoda.org

### 'धम्मालय' विश्राम गृह

एक दिवसीय महाशिबिरासाठी आल्यावर रात्री **'धम्मालय'** मध्ये विश्रातीसाठी सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी आणि (बुकिंग) नोंदणीसाठी **संपर्कः** 022 50427599 or email- *info.dhammalaya@globalpagoda.org or info@globalpagoda.org*

### अतिरिक्त उत्तरदायित्व

1. श्री सचिन व गिरिजा नातु, क्षेत्रीय संयोजक आचार्य अहमदनगर, रायगड, पुणे

### अतिरिक्त उत्तरदायित्व केंद्र-आचार्य

1. श्री विनय दाहट, धम्मसुगति नागपुर केंद्र-आचार्यांच्या रूपाने सेवा

### नव नियुक्त सहायक आचार्य

1-2. श्री महेंद्र व श्रीमती रीटा भंडारी, मुंबई
3. श्री संतोष डांगे, पूर्णा ज. परभणी
4. श्रीमती ऊषा अगरवाल, पटना (बिहार)
5. श्रीमती सविथा श्री हर्ष, USA

### बालशिबिर शिक्षक

1. अजरुद्दीन शेख, गांधीनगर
2. श्रीमती कुसुम रजनीकांत परमार, अहमदाबाद
3. श्रीमती रंजना राय, अहमदाबाद
4. श्रीमती प्रेरणा कांबळे, कोल्हापुर
5. श्री रतन प्रकाश शेलके, कोल्हापुर
6. श्री संदीप ज्ञानदेव गुरव, सांगली
7. श्री प्रथमेश चंद्रकांत पाटिल, कोल्हापुर
8. श्रीमती स्तुति गुहा, गुवाहाटी
9. श्रीमती अजिता गोहेन, गुवाहाटी
10. श्री गिरीन्द्र पाठक, तेजपुर
11. श्रीमती शिल्पाबेन हिरपारा, राजकोट
12. डॉ. हेमंत बापूसाहेब बामने, राजकोट
13. श्रीमती सोनलबेन बी सोलंकी, राजकोट

### बालशिबिर क्षेत्रीय संयोजक

1. श्री वेंकटसुब्रमणि बालकृष्णन- क्षेत्रीय संयोजक बालशिबिर - चेन्नई, पांडिचेरी

### दोहे धर्माचे

धर्म-रत्ना सम जगतात, अन्य रत्न ना कोय।
जो पावे समृद्ध होत, दुःख दैन्य ना होय॥
बुद्ध रत्नात धर्म हाच, रत्न प्रमुखतम होय।
महाकारुणिक जगत हित, धर्म-प्रकाशक होय॥
संघ रत्नात धर्म हाच, रत्न प्रमुखतम होय।
काया वाणी चित्ताची, कर्म धर्ममय होय॥
तीन रत्नांच्या शरणात, धर्म रत्न हे जाण।
धर्म रत्न धारण करी, तर होतसे कल्याण॥
जो च आपल्या कल्याणात, सतत सहायक होय।
कल्याण मित्र भव-मुक्तीत, सहयोगी रे होय॥
अशा मंगल मित्राने, खरे हित सुख होय।
शुद्ध धर्माचा पथ मिळे, मुक्ती दुःखातून होय॥

### दोहे धर्माचे

दुर्लभ येणे बुद्धाचे, दुर्लभ बुद्ध मिलाप।
शुद्ध धर्म मिळाल्या विना, मिटे च ना भवताप॥
बुद्ध संपर्काने मिळे, शुद्ध धर्माचे सार।
शुद्ध धर्मामुळे सुटती, कर्मकांड च निसार॥
शुद्ध धर्मामुळे तुटती, संप्रदायाचाच बाड।
सुटे दर्शन मान्यता, उघडे मुक्ती कवाड॥
ब्राह्मण वा शुद्र रे, राजा वा रंक रे।
शुद्ध धर्म धारण करी, निर्मळ अभय अशंक॥
दुर्लभ जीवन मनुजाच, भरपूर पुण्य मिळव रे।
ना तर भव भ्रमणामध्ये, अधोगती मिळे रे॥
मानव जीवन मिळाले, धर्म मिळाला अजोड।
श्रद्धा अन् प्रयत्नाने, बंधने तुझी सोड॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2568, आषाढ पौर्णिमा, 21 जुलै, 2024 वर्ष 8 अंक 4

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/RNP 286/2024-2026

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 06 JULY 2024, DATE OF PUBLICATION: 21 JULY, 2024**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरी, इगतपुरी - 422 403**
**जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत**
**फोन : (02553) 244998, 243553, 244076, 244086, 244144, 244440**
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org